पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. ब प्रभाग समिति
कार्यपत्रिका क्रमांक १
सभावृत्तांत

दिनांक – २८/०४/२०१४ वेळ : सकाळी ११.४० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ब प्रभाग समितीची सभा सोमवार दि.२८/०४/२०१४ रोजी सकाळी ११.४० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील मा.महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
२. मा.लोंढे गणेश नारायण
३. मा.पठाण शमीम
४. मा.अँड.चिंचवडे संदिप गुलाबराव
५. मा.चिंचवडे पाटील अश्विनी गजानन
६. मा.डोके अपर्णा निलेश
७. मा.को-हाळे अनंत सुभाष
८. मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख
९. मा.जगताप विमलताई सुरेश
१०. मा.बारणे निलेश हिरामण
११. मा.बारणे आप्पा उर्फ श्रीरंग चंदू
१२. मा.बारणे माया संतोष
१३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१४. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१५. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१६. मा.कलाटे स्वाती मयुर

याशिवाय मा. सुभाष माछरे, क्षेत्रीय अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय, श्री.शांताराम राऊत, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा, ब प्रभाग समिती हे उपस्थित होते.

-------

**मुख्य कार्यकारी अधिकारी (पिठासीन अधिकारी)** सन्मा.सदस्य, मा. क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी

सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी  या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे मा. ब प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)** मा.ब प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण ०३ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | मा.ओव्हाळ शेखर अशोक | **मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड** | मा.बारणे माया संतोष |
| २. | मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख | मा.बारणे निलेश हिरामण | **मा.अश्विनी गजानन चिंचवडे** |
| ३. | मा.साबळे छाया जगन्नाथ | मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | मा.पवार यमुनाताई रमणनाना |

(मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभा शाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त ०३ नामनिर्देशन पत्रे मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली. )

**मुख्य कार्यकारी अधिकारी - (पिठासीन अधिकारी)** मा. ब प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त तीन उमेदवारांची एकूण ३ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून ती ३ नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत.

त्यामध्ये मा.ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.ओव्हाळ शेखर अशोक, मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख व मा.साबळे छाया जगन्नाथ हे तीन रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे देवुन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(मा. पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला सकाळी ११.५० ते दुपारी १२.०५ हा १५ मिनिटांचा कालावधी संपला. )

**मुख्य कार्यकारी अधिकारी (पिठासीन अधिकारी)**

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये मा. ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.ओव्हाळ शेखर अशोक, मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख व मा.साबळे छाया जगन्नाथ यापैकी कोणीही उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्यां बेळेमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेतला नसलेने ब प्रभाग समिती सभापती पदासाठी निवडणूक घेणेत येत आहे. (सचिव यांना निवडणूक नियम वाचून दाखविले) त्यानंतर वैध उमेदवारांची वर्णानुक्रमानुसार नावे घोषित करून उपस्थित सदस्यांच्या मतांची संबंधित उमेदवाराचे नावापुढे नोंद घेणेत आली व व्हीडीओ चित्रीकरण करण्यात आले. सदर उमेदवारांना खालीलप्रमाणे मते मिळाल्याचे जाहिर करण्यात आले.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | एकुण प्राप्त मते |
|---|---|---|
| १. | मा.ओव्हाळ शेखर अशोक | १० |
| २. | मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरंख | ०५ |
| ३. | मा.साबळे छाया जगन्नाथ | ० |
| | एकूण | १५ |

विषय क्रमांक – १

ठराव क्रमांक – १

विभाग – प्रशासन

दिनांक – २८/०४/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरीता १) मा.ओव्हाळ शेखर अशोक २) मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख व ३) मा.साबळे छाया जगन्नाथ या तीन उमेदवारांनी प्रत्येकी एक या प्रमाणे एकूण ०३ नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून त्यापैकी ०३ वैध व ० अवैध ठरलेली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये मा. ब प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.ओव्हाळ शेखर अशोक, मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख व मा.साबळे छाया जगन्नाथ यापैकी कोणीही उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या वेळेमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेतला नसलेने ब प्रभाग समिती सभापती पदासाठी निवडणूक घेणेत येत आहे. (सचिव यांना निवडणूक नियम वाचून दाखविले) त्यानंतर वैध उमेदवारांची वर्णानुक्रमानुसार नावे घोषित करून उपस्थित सदस्यांच्या मतांची संबंधित उमेदवाराचे नावापुढे नोंद घेणेत आली व व्हीडीओ चित्रीकरण

करण्यात आले. सदर उमेदवारांना खालीलप्रमाणे मते मिळाल्याचे जाहिर करण्यात आले.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | एकुण प्राप्त मते |
|---|---|---|
| १. | मा.ओव्हाळ शेखर अशोक | १० |
| २. | मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख | ०५ |
| ३. | मा.साबळे छाया जगन्नाथ | ० |
| | एकूण | १५ |

रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवारां पैकी मा.ओव्हाळ शेखर अशोक यांना सर्वाधिक म्हणजे एकुण १० मते प्राप्त झाली असल्याने ब प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता **मा.ओव्हाळ शेखर अशोक** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समिती सभापती पदावर बहुमताने यथोचितरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

यानंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(कांतीलाल उमाप)
पिठासीन अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब क्षेत्रीय कार्यालय, चिंचवड ३३.
क्रमांक : बक्षेका/२/कावि/ ५० /२०१४
दिनांक : २८/०४/२०१४

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
ब प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.